**प्रेसनोट दिनांक १५/०६/२०१९**
**पोलीस स्टेशन- येरवडा पोलीस स्टेशन, पुणे**

**कम्युनिटी पोलीसींग व सहकार्यातून सुरक्षेकडे संकल्पने अंतर्गत पुणे म.न.पा.चे गलांडे दवाखाना, कल्याणीनगर पुणे येथे भेट देवून तेथील महिला कर्मचारी यांची बैठक घेवून त्यांना सुरक्षेबाबत मागदर्शन केले.**

---

कम्युनिटी पोलीसींग व सहकार्यातून सुरक्षेकडे (सीसीटीव्ही कॅमेरे प्रकल्प) या संकल्पने अंतर्गत श्री.अजय वाघमारे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), अति.कार्यभार वरिष्ठ पो.निरी.,येरवडा पो.स्टे. यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पो.स्टे.कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने यांनी दि.१३/०६/२०१९ रोजी १०:१० वा. ते १०:४५ वा.चे दरम्यान येरवडा पो.स्टे.चे हद्दीतील पुणे महानगर पालिका गलांडे दवाखाना, कल्याणीनगर, पुणे येथे भेट देवून तेथील महिला डॉक्टर, कर्मचारी यांची बैठक घेतली. त्यांच्या अडीअडचणी समजावून घेतल्या. त्यांना महिला व बालकांचे संदर्भात घडणारे गुन्हे, महिला व बालकांचे संदर्भातील कायदे यांची माहिती देऊन असे गुन्हे घडू नयेत याकरीता घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले. तसेच नोकरदार महिलांचे सुरक्षेसाठी सुरू असलेल्या बडीकॉप संकल्पनेची व पोलीस आयुक्तालय, पुणे येथे जेष्ठ नागरिक, महिला व बालकांचे संदर्भातील तक्रारींचे निराकरण करण्यासाठी नव्याने स्थापन करण्यात आलेल्या भरोसा सेलची माहिती दिली. त्याचबरोबर पोलीस आयुक्तालयाकडून नागरिकांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध १४ योजनांची माहिती दिली. मा.पोलीस आयुक्त सो. पुणे यांचे सहकार्यातून सुरक्षेकडे या संकल्पनेची माहिती व सीसीटीव्ही कॅमे□ांचे महत्व समजावून देवून दवाखान्याचा अंतर्गत व बाह्य परिसर कव्हर होईल अशा रितीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत आवाहन केले.

अशा प्रकारे श्री.अजय वाघमारे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), अति.कार्यभार वरिष्ठ पो.निरी. यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पोलीस स्टेशन कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने यांनी पुणे मनपा गलांडे दवाखाना, कल्याणीनगर, पुणे येथे भेट देवून तेथील महिला डॉक्टर, नर्स स्टाफ यांची बैठक घेऊन त्यांना पुणे पोलीस आयुक्तालयाकडून नागरिकांचे सुरक्षेसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती देऊन उल्लेखनिय कामगिरी केली आहे.



